दैनिक

# रायगड नगरी

अन्यायाचा प्रतिकार

महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

• वर्ष १६ वे • अंक ३४४ • MAHMAR/2006/17212 • रायगड • गुरुवार दि.१० मार्च २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# नवाब मलिकांच्या राजीनाम्यासाठी भाजप आक्रमक

## आझाद मैदान ते विधानभवनापर्यंत धडक मोर्चा

**दै.रायगड नगरी । मुंबई**

**नवाब मलिकांचा राजीनाम्याच्या मागणीसाठी भाजप आक्रमक झाली असून, आझाद मैदान ते विधान भवनापर्यंत धडक मोर्चाचे काढण्यात आला. आझाद मैदानातून निघालेला मोर्चा मेट्रो सिनेमाजवळ अडवला. तत्पूर्वी आझाद मैदानात कार्यकर्त्यांना संबोधित करताना भाजपचे विधानसभेतील विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी महाविकास आघाडीच्या ठाकरे सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. तसेच विधानसभेतील आपल्या विधानाचा उल्लेख करत कालचा पेनड्राइव्ह बॉम्ब ही केवळ एक झलक होती. पिक्चर अभी बाकी है... आणखी बॉम्ब ठेवलेत, असा इशारा देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी बोलताना दिला.**



**भाजपानं नवाब मलिक यांच्या राजीनाम्यासाठी विधानसभा विरोधी पक्षनेते आणि राज्याचे माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली मुंबईत धडक मोर्चा काढला. यावेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल तसेच रायगड जिल्ह्यातील भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते या मोर्चात हजारोंच्या संख्येने सहभागी झाले होते.**

हा संघर्ष साधा नाही. तर देशभक्तांचा संघर्ष आहे. देशद्रोह्याच्या विरोधात संघर्ष आहे. पाकिस्तान धार्जिण्या लोकांविरोधात संघर्ष आहे. ज्या भारतमातेसाठी अनेकांनी बलिदान दिलं त्यांच्यासाठी हा संघर्ष आहे. दहशतवाद्यांसोबत आर्थिक व्यवहार असलेल्या आरोपामुळे जेलमध्ये गेलेल्या मंत्री नवाब मलिकांचा राजीनामा होत नाही तोवर शांत बसू शकत नाही. ही मागणी केवळ राजकारणासाठी नाही. आम्ही रोज राजीनामे मागत नाही. मात्र ही घटना पाहिली तर मुंबईकरांच्या मारेकऱ्यांसोबत ज्यांनी आर्थिक व्यवहार केले त्यांनी राजीनामा दिला पाहिजे, या मागणीचा पुनरुच्चार देवेंद्र फडणवीस यांनी केला.

विधानसभेतील आपल्या आरोपांचा संदर्भ देत देवेंद्र फडणवीस म्हणाले की, कालचा पेनड्राइव्ह बॉम्ब ही केवळ एक झलक होती. पिक्चर अभी बाकी है... आणखी बॉम्ब ठेवले आहेत. तुम्ही आमच्याविरोधात षडयंत्र करत आहात. पण आम्ही घाबरणार नाही. एका नरेंद्र मोदीला संपवण्यासाठी तुम्ही सगळे एकत्र आला. परंतु जनतेचा आशीर्वाद असल्यानं ते जागतिक नेते झाले. आम्ही मोदींचे सैनिक आहोत. त्यांचा आशीर्वाद आमच्यामागे आहे. आमचे संबंध गुन्हेगारांशी नाही. आमच्याविरोधात कितीही षडयंत्र केले तर शिवरायांच्या आशीर्वादाने ते हाणून पाडू. आमच्याकडे अनेक बॉम्ब आहेत. योग्यवेळी तो फोडला जाईल, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

# महाडमधील 'त्या' स्फोटामागचं कारण काय? लवकरच होणार उकल

**दै.रायगड नगरी । महाड**

रायगड जिल्ह्यातील महाड एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कांबळे तर्फ महाडजवळ झालेल्या स्फोटामागील कारण लवकरच उलगडणार आहे. एका गुन्ह्यात जप्त केलेली स्फोटके नष्ट करताना हा स्फोट झाला होता. यात तीन पोलीस कर्मचारी जखमी झाले होते. ही घटना घडली कशी? त्यामागचे कारण काय याची चौकशी करण्यासाठी समिती स्थापन केली आहे, असे सांगण्यात येत आहे.

महाड एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत कांबळे तर्फ महाडजवळ मोठा स्फोट झाला होता. पोलिसांनी एका गुन्ह्यात जप्त केलेली स्फोटके नष्ट करताना हा स्फोट झाला होता. यात तीन पोलीस कर्मचारी जखमी झाले होते. त्यातील दोघे गंभीर होते. त्यांच्यावर नवी मुंबईतील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तर अन्य एका पोलीस कर्मचाऱ्याला उपचार करून घरी सोडण्यात आले आहे. स्फोटकांची विल्हेवाट लावताना स्फोट झाला कसा? यामागे नेमके कारण काय, असे प्रश्न यानिमित्ताने उपस्थित झाले होते. याबाबत रायगडचे पोलीस अधीक्षक अशोक दुधे यांनी महत्वाची माहिती दिली आहे. या घटनेची चौकशी समितीमार्फत केली जाणार आहे, असे त्यांनी सांगितले.

२०13 साली माणगाव येथे एका गुन्ह्यात पोलिसांनी कारवाई करताना स्फोटके जप्त केली होती. या प्रकरणात कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर जप्त स्फोटकांची विल्हेवाट लावली जाणार होती. महाडच्या परिसरात स्फोटकांची विल्हेवाट लावण्यात येत होती. त्याचवेळी स्फोट झाला. त्यात बॉम्ब शोधक आणि नाशक पथकातील तीन पोलीस कर्मचारी जखमी झाले होते. त्यातील दोघे गंभीर होते, तर एकाला किरकोळ दुखापत झाली होती. दोघांवर नवी मुंबईतील रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

तर एका पोलीस कर्मचाऱ्याला उपचारानंतर सोडण्यात आले आहे. दरम्यान, आज सकाळी कोकण परीक्षेत्र अधिकारी संजय मोहिते, रायगडचे पोलीस अधिक्षक अशोक दुधे, महाडचे उपविभागीय पोलीस अधिकारी नीलेश तांबे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. या प्रकरणाची नोंद महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. घटनेच्या चौकशीसाठी समिती नेमून यामागील कारणांचा शोध घेतला जाणार आहे, असे दुधे यांनी सांगितले.

# मत्स्य सचिव आणि आयुक्तांच्या मनमानी विरोधात कोकणच्या मच्छीमारांचे आक्रोश आंदोलन



**दै.रायगड नगरी । उरण**

काल कोकण विभागीय मच्छिमारांनी त्यांच्या विविध न्याय्य मागण्यासाठी मुंबई येथील आझाद मैदानावर आक्रोश आंदोलन पुकारले होते. यावेळी मच्छीमार एकजुटीचा विजय असो, अरे कोण म्हणतो देणार नाय घेतल्या शिवाय राहणार नाय, मागण्या आमच्या हक्काच्या नाही कुणाच्या बापाच्या, मत्स्य सचिव आणि आयुक्त यांनी मच्छीमारांबाबत जो मनमानी कारभार सुरू ठेवला आहे तो तात्काळ बंद करावा, अशी घोषणाबाजी महाराष्ट्र राज्य मच्छीमार सहकारी संघ मर्यादितचे अध्यक्ष रामदास पांडुरंग संधे यांचे नेतृत्वाखाली काल आझाद मैदानात धरणे आंदोलनात देऊन मच्छीमारांनी आझाद मैदान दणाणून सोडले होते.

यामध्ये शासनाने लागू केलेल्या जाचक अटी व शर्थीमुळे १२० पेक्षा उच्च अश्वशक्ती असलेल्या नौकांच्या डिझेल कोटा तात्काळ मंजूर करून मागील तीन-चार वर्षापासून ची प्रलंबित थकित डिझेलवरील मूल्यवर्धित विक्रीकर प्रतिपूर्ती रक्कम अंदाजे साडेतीनशे कोटी तात्काळ वितरित करण्यात यावी.

हाय स्पिड डिझेलचे कन्झ्युमर किंमतीत झालेली वाढ त्वरीत कमी करावी.आर्थिक वर्षाचा डिझेल कोटा मंजूर झालेनंतर पुन्हा टप्या-टप्प्याने डिझेल मंजूर करण्याचे धोरण रद्द करावे.महाराष्ट्र सागरी मासेमारी अधिनियम, १९८१ यात सुधारणा करण्यासाठी दि.२१ नोव्हेंबर २०२१ रोजी जारी केलेल्या अटी/शर्ती मागे घेऊन नव्याने फेर सुधारणा करण्यासाठी राज्य/जिल्हा मच्छिमार संघ व तज्ञ मच्छिमार प्रतिनिधी यांना विचारात घेऊन त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

करंजा येथील करंजा टर्मीनल लॉजिस्टीक या बंदाराच्या कामामुळे करंजा-धरमतर खाडीतील मासेमारी व्यवसायावर विपरीत परिणाम झाला असून मच्छिमार व्यवसाय पूर्णपणे अडचणीत आलेला आहे. स्कील इन्फ्राचे अध्यक्ष निखिल गांधी यांच्यावरील झालेल्या ईडीच्या जप्ती कारवाईने करंजा टर्मिनल ॲण्ड लॉजिस्टीकचे भवितव्य .../२

# पनवेल बार असोसिएशन तर्फे महिला दिन साजरा





**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुका विधी सेवा समिती आणि पनवेल बार असोसिएशन, पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने महिला दिनाचे औचित्य साधून पनवेल महिला वकील वर्ग व पनवेल कोर्ट महिला स्टाफ ह्यांचे विनामुल्य हिमोग्लोबीन व थायरॉइड टेस्ट करण्यात आली. पनवेल येथील ॲरोहेड लॅब, पनवेल यांनी सहकार्य केले.

सदर उपक्रमास सर्व महिलांनी रक्त चाचणी करून चांगला प्रतिसाद दिला. सदर उपक्रमाचे उद्घाटन जिल्हा न्यायाधीश १ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश पनवेल रायगड अस्मर, तदर्थ जिल्हा न्यायाधीश १ व सहाय्यक सत्र न्यायाधीश, पनवेल रायगड भाकरे, जिल्हा न्यायाधीश ३ व सहाय्यक सत्र न्यायाधीश पनवेल रायगड शिंदे यांनी केले.

तसेच महिला दिन निमित्ताने जिल्हा न्यायाधीश २ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश पनवेल रायगड, श्रीमती माधुरी आनंद तसेच दुसरे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर पनवेल, श्रीमती गोडसे, दुसरे न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, पनवेल श्रीमती पाटील ह्यांनी महिला सक्षमीकरण ह्या विषयावर मोलाचे मार्गदर्शन केले.

सदर कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी पनवेल वकील संघटनेच्या ॲड. अस्मिता भुवड, ॲड. हेमा भगत, ॲड. सीमा भोईर ह्यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी अमृता नाईक, प्रगती माळी, सीमा भोईर, मीरा ठाकूर, विजया म्हात्रे, मनिषा गायकर यांच्यासह अनेक महिला वकील उपस्थित होत्या.

## संक्षिप्त...

### ...म्हणून त्यांना त्रास दिला जातोय : शरद पवार

**दै.रायगड नगरी । मुंबई**

विरोधी पक्षनेते आणि माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आरोपावर राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी प्रतिक्रिया दिली आहे. महाराष्ट्रातील सरकार तपास यंत्रणांचा वापर करूनही अस्थिर करण्याच्या प्रयत्नात यश येत नसल्यानेच ही टोकाची भूमिका फडणवीस यांनी घेतली, असं शरद पवार यांनी सांगितले. तसेच भाजपाकडून सत्ताधाऱ्यांना नाउमेद करण्याचा प्रयत्न सुरू असल्याची टीका देखील शरद पवार यांनी केली आहे.

शरद पवार म्हणाले की, व्यक्तिशा या गोष्टीत माझा कुठलाही संबंध नाही. आमची एक तक्रार आहे. कुणी तरी तक्रार करायची आणि त्या तक्रारीतून लोकप्रतिनिधींवर वेगवेगळ्या एज-न्सीची मदत घेऊन त्यांना नामशेष केलं जात आहे. बंगाल आणि महाराष्ट्रात त्याची संख्या अधिक आहे. अनिल देशमुखांची तक्रार पोलीस अधिकाऱ्याने केली. देशमुख तुरुंगात आहे. ज्यांनी तक्रार केली त्यांच्या चौकश्या सुरू आहेत. देशमुख यांना तुरुंगात टाकल्यानंतर चौकशी कशा पद्धतीने किती वेळा केली जाते. सत्त-ेचा गैरवापर करून कशी केली जाते त्याचं हे मूर्तीमंत उदाहरण आहे, असं शरद पवारांनी यावेळी सांगितलं.

# ९ लाभार्थ्यांना १ लाख ८० हजाराचे धनादेश तहसीलदार विजय तळेकर यांच्या हस्ते वाटप

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तहसिलदार कार्यालय पनवेल, येथे या जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित केलेल्या महिला दिनाच्या कार्यक्रमांतर्गत संजय गांधी निराधार योजना, श्रावण बाळ सेवा राज्य योजना, केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय कुटुंब अर्थसहाय्य योजनेअंतर्गत योजनांबाबत एकनाथ विष्णू नाईक, (नायब तहसिलदार, संजय गांधी योजना), यांनी योजनांची माहीती देऊन कार्यक्रमाची प्रस्तावना केली.

पनवेल तालुक्यातील संजय गांधी निराधार योजनांचे अध्यक्ष तथा



तहसिलदार पनवेल, तसेच या समितीचे शासकिय सदस्य, गटविकास अधिकारी, पंचायत समिती पनवेल, यांच्या झालेल्या समितीच्या बैठकीत, मंजूर झालेल्या संजय गांधी योजना, श्रावणबाळ योजना, विधवा, वृध्दापकाळ योजनेच्या पात्र ५३ पात्र लाभार्थ्यांना एकुण ५५ हजार ६०० रूपये रक्कमेची मंजूरी दिलेली असून उपस्थित विधवा व अपंग महिला २५ लाभार्थ्यांना अर्थसहाय्य मंजूरीचे प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले.

तसेच केंद्र शासनाचे राष्ट्रीय कुटुंब अर्थसहाय्य योजनेअंतर्गत १८ ते ५९ वर्षे वयाच्या कुटुंबातील कर्ता पुरूष मयत झाल्यास त्याचे कुटुंबाला राष्ट्रीय कुटुंब अर्थसहाय्य योजनेचा लाभ दिला जातो. सदर योजनेअंतर्गत मंजूर झालेल्या ९ लाभार्थ्यांना प्रतिलाभार्थी रक्कम रूपये २० हजार याप्रमाणे एकूण रक्कम रूपये १ लाख ८० हजाराचे धनादेश विजय तळेकर, तहसीलदार पनवेल यांचे हस्ते वितरीत करण्यात आले आहेत.

# राज ठाकरे राज्यपालांवर बरसले

**दै.रायगड नगरी । पुणे**

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी पुण्यात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या १६ व्या वर्धापनदिनाच्या मेळाव्यात बोलताना राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्यावर घणाघाती टीका केली आहे. 'तुम्हाला काय कळतं का? शिवाजी महाराज, रामदास स्वामी....आपला काय संबंध नसताना काहीही बोलून जायचं. शिवाजी महाराजांनी कधीही सांगितलं नाही की रामदास स्वामी माझे गुरू आहेत, ना रामदास स्वामींनी सांगितलं शिवाजी महाराज माझे शिष्य आहेत,' असं म्हणत राज ठाकरे यांनी राज्यपाल कोश्यारी यांच्या वक्तव्यावर टीकास्त्र सोडलं आहे.

रामदास स्वामी नसते तर शिव-ाजी महाराज नसते, असं वक्तव्य करत राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी वाद ओढवून घेतला होता. तसंच राज्यपाल कोश्यारी यांनी महात्मा जोतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्याबाबतही आक्षेपार्ह वक्तव्य केलं होतं. राज्यपालांच्या या वक्तव्यावर राज्यभरातून .../२

# महाड औद्योगिक वसाहतीतील सांडपाणी वाहिनीच्या दुरुस्ती कामात विलंब

## अ.प्रशांत ठाकूर यांनी वेधले शासनाचे लक्ष

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाड येथील औद्योगिक वसाहतीतील सांडपाणी वाहुन नेण्याची वाहिनी नादुरुस्त असल्याबाबत आमदार प्रशांत ठाकूर यांनी मुंबई येथे सुरु असलेल्या विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात तारांकित प्रश्न दाखल करत या समस्येवर शासनाचे लक्ष वेधले.



रायगड जिल्ह्यातील महाड येथील औद्योगिक वसाहतीतील सांडपाणी वाहुन नेण्याची वाहीनी नादुरुस्त असल्यामुळे औद्योगिक वसाहतीतील रासायनिक व दुषित पाणी उक्त परिसरातील शेतीत शिरुन शेतकऱ्यांच्या शेतीचे मोठ्याप्रमाणात नुकसान होत असल्याचे जानेवारी २०२२ मध्ये निदर्शनास आले आहे. या औद्योगिक वसाहतीत सुमारे ३५ किलो मीटरची सांडपाणी वाहून नेणाऱ्या वाहीनीच्या दुरुस्तीच्या कामासाठी जवळपास २०० कोटीपेक्षा जास्त खर्च होणार आहे असून सांडपाणी वाहून नेणारी वाहिनी दुरुस्त करण्यासाठी २५ टक्के खर्च करण्याची तयारी महाड औद्योगिक वसाहतीतील उत्पादक संघटनेने दाखविली असूनसुद्धा संबंधित विभागातील प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे सांडपाणी वाहून नेणाऱ्या वाहिनीच्या दुरुस्तीच्या कामात विलंब होत .../२

# कुटुंबातील महिलेचे आरोग्य उत्तम तर संपूर्ण कुटुंबाचे आरोग्य उत्तम : सुभाष देसाई

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

कुटुंबातील महिलेचे आरोग्य उत्तम राहिले तर तिच्या संपूर्ण कुटुंबाचेही आरोग्य उत्तम राहते, असे प्रतिपादन राज्याचे उद्योगमंत्री सुभाष देसाई यांनी माणगाव येथे केले.

जागतिक महिला दिनानिमित्त माणगाव नगरपंचायत व उपजिल्हा रुग्णालय माणगाव यांच्या संयुक्त विद्यमाने उपजिल्हा रुग्णालय या ठिकाणी बुधवार, दि.०९ मार्च रोजी महिलांसाठी आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते, त्यावेळी ते बोलत होते. सदर शिबिरात माणगाव येथील तज्ज्ञ डॉक्टरांनी महिलांची आरोग्य



तपासणी केली.

या शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी कार्यक्रमाला जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर, नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुहास माने, ॲड.राजीव साबळे, अनिल नवगणे, .../२

**शॉप विकणे आहे**

पनवेल महानगरपालिका हद्दीत ६१५ बिल्टअप एरिया असलेले शॉप विक्री करणे आहे.

-: संपर्क :-

9321592113

8104477440

# आंबोली येथील १३ रत्नांच्या कार्याचा आढावा माझ गाव माझी माणस पुस्तकात शब्दबद्ध




**दै.रायगड नगरी । माथेरान**

मनुष्याने आपल्या दैनंदिन जीवनात जीवन जगत असताना स्वतःच्या कुटुंबासह गावाच्या हितावह दिलेले योगदान हे महत्त्वाचे ठरते. आणि त्यातच एखाद्या व्यक्तीने जीवनाचा अत्यंत संघर्षमय प्रवास करत यशाचे उंच शिखर पादाक्रांत करून जो काही नावलौकिक प्राप्त केलेला असतो अशा कर्तृत्ववान लोकांच्या कार्याचा आलेख तळागाळातील लोकांना ज्ञात असावा हा दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून त्या त्या कर्तृत्ववान लोकांच्या भूतकाळातील इतिहासाचे मूल्यमापन अन वर्तमानातील जनहितार्थ सकारात्मक सेवाभावी उपक्रम यांची सांगड घालून आपल्या लेखणीच्या माध्यमातून लोकांसमोर आणण्याचा प्रयत्न आंबोली तालुका खेड जिल्हा पुणे येथील डॉ. संजय ज्ञानदेव शिंदे उपप्राचार्य व मराठी विभाग प्रमुख हुतात्मा राजगुरु महाविद्यालय राजगुरूनगर यांनी शब्दबद्ध केलेल्या माझ गाव माझी माणस या पुस्तकाचे प्रकाशन दि.७ मार्च रोजी आंबोली या ठिकाणी मान्यवरांच्या उपस्थितीत मोठया दिमाखात प्रकाशन करण्यात आले.

याप्रसंगी खेड तालुक्यातील शिक्षण प्रसारक मंडळ अध्यक्ष ऍड.देवेंद्र बुट्टेपाटील, खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर,पुणे जिल्हापरिषद सदस्य अनिलभाऊ देशमुख,कृषी व पशुसंवर्धन पुणे जिल्हा परिषद सभापती अरुण चांभारे,अक्षरवाङ्मय प्रकाशक पुणे बाळासाहेब घोंगडे,उप प्राचार्य पुणे महाविद्यालय प्रकाश चौधरी, आंबोलीच्या सरपंच नकुशा शिंदे, माथेरान नगरीचे माजी नगराध्यक्ष मनोज खेडकर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. अत्यंत तलख बुद्धिमत्तेन आंबोली गावातील भूमिपुत्र ज्यांचे खरोखरच कार्य मोठे आहे ज्यांनी शून्यातून विश्व निर्माण करण्यासाठी अपार कष्ट घेतले आहेत अशा एकूण तेरा कर्तबगार लोकांच्या कार्याचा आढावा माझ गाव माझी माणस या पुस्तकात शब्दबद्ध केला आहे. जन्मभूमी आंबोली जिल्हा पुणे आणि कर्मभूमी ही रायगड जिल्ह्यातील सुंदर पर्यटनस्थळ माथेरान या ठिकाणी अनेक वर्षांपासून वास्तव्यास असलेले सलग दोनदा माथेरान नगरपरिषदेचे नगरसेवक पद भूषविलेले माजी नगरसेवक, गोकुळ रेस्टॉरंटचे मालक तथा एक यशस्वी उद्योजक म्हणून ज्यांच्याकडे आदराने पाहिले जाते त्या शिवाजी शांताराम शिंदे यांच्या आजवरच्या पूर्व आणि वर्तमानातील संघर्षमय कार्याचा उल्लेख या पुस्तकात केला आहे. हा नेत्रदीपक सोहळा पाहण्यासाठी माथेरान मधील समर्थक माजी नगराध्यक्ष मनोज खेडकर, उद्योजक नितीन शहा, मंगेश शिंदे, पतसंस्था सभापती हेमंत पवार, धनगर समाज अध्यक्ष राकेश कोकळे, माजी नगरसेवक प्रकाश सुतार,भास्कर शिंदे, मंगेश परदेशी, सामाजिक कार्यकर्ते सुनील शिंदे, मुकुंद रांजाणे,केतन रामाणे,हर्ष शिंदे,नरेश परदेशी ही मंडळी शिवाजी शिंदेंच्या आंबोली या गावी उपस्थित राहून या भव्यदिव्य कार्यक्रमाचे साक्षीदार होण्यासाठी गर्दी केली होती.लेखक डॉ. संजय शिंदे यांनी आपल्या गावातील योगदान दिलेल्या व कष्ट करून आपल्या आयुष्याच सोनं करणाऱ्या १३ रत्नांचा जीवनप्रवास अतिशय समर्पकपणे मांडला आहे. यामध्ये शिवाजी शिंदेंचा जीवनप्रवास , माथेरानचा माथा या शिर्षकात यथोचित मांडला आहे या पुस्तकात शिवाजी शिंदेचा समावेश हे आम्हा मित्रपरिवारासाठी अभिमानास्पद आणि भूषणावह बाब आहे त्यानिमित्ताने लेखकांचे मनःपूर्वक धन्यवाद ह्या पुस्तकातून भावी पिढीला नक्कीच बोध मिळू शकतो आणि एक नवी ऊर्जा यानिमित्ताने मिळू शकते सर्वानी हे पुस्तक अवश्य वाचावं अन संग्रही ठेवावे असेच आहे वाचकांसाठी या पुस्तकाच्या प्रती गोकुळ रेस्टॉरंट माथेरान येथे उपलब्ध आहेत.असे माथेरान वनसंरक्षक समितीचे माजी अध्यक्ष योगेश जाधव यांनी सांगितले.

# पनवेल शहर जिल्हा महिला काँग्रेसचा पद नियुक्तीचा कार्यक्रम संपन्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाराष्ट्र महिला काँग्रेसच्या प्रभारी ममता भुपेशजी तसेच महाराष्ट्र प्रदेश महिला काँग्रेसच्या अध्यक्षा संध्या सव्वलाखे यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल शहर जिल्हा महिला कार्यकारणी आणि ब्लॉक अध्यक्षा यांना ८ मार्च २०२२ रोजी जागतिक महिला दिनाचे वैचित्य साधून पद नियुक्ती करण्यात आली आणि पुढील उज्वल कार्यासाठी शुभेच्छा दिल्या गेल्या.

सदर नियुक्ती झालेल्या महिलांची नावे पनवेल ब्लॉक अध्यक्षा आरती ठाकुर, नवीन पनवेल महिला अध्यक्षा पूजा मोहन, खारघर महिला अध्यक्षा सोनिया सोहोता, पनवेल शहर जिल्हा महिला उपाध्यक्षा भारती जळगावकर, उपाध्यक्षा व सोशल मीडिया इंचार्ज, सरचिटणीस नीता शेणॉय, सरचिटणीस, फ्लेविया अहिरवार सरचिटणीस अंजुम तेरवा, सरचिटणीस सायरा कुणी, चिटणीस किरण तळेकर, चिटणीस रेशमा खान सदर नियुक्ती हे महाराष्ट्र प्रदेश महिला काँग्रेस सरचिटणीस चंद्रकला नायडू आणि पनवेल शहर जिल्हा महिला अध्यक्षा निर्मला म्हात्रे यांच्या हस्ते देण्यात आला व त्यांना पुढील कार्यासाठी व पक्ष वाढीसाठी हार्दिक शुभेच्छा व्यक्त केल्या.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## मनमानी विरोधात कोकणच्या मच्छीमारांचे आक्रोश आंदोलन

अंधारमय झाले आहे. या करंजा टर्मिनलमध्ये निखिल गांधी यांचे व्यावसायिक हितसंबंध असून त्यांची भागीदारी आहे त्या मुळे करंजा टर्मीनल लॉजिस्टीकचे भवितव्य अंधकारमय झालेले आहे. या प्रकरणी मा.ना.अस्लम शेख साहेब, मंत्री मत्स्य व बंदरे,यांनी लक्ष देणे आवश्यक आहे.

या प्रकल्पासाठी मच्छिमार संस्थांना दिलेल्या जमिनींची लीज वाढवावी.मच्छीमार संस्थांचे बर्फ करखाण्याकरिता प्रती युनिट रु.५/- इतके या अनुदान मिळावे.आणि इतरही काही महत्वाच्या मागण्या केल्या, या आंदोलनाचं पडसाद विधानसभेत घुमताच मा. मत्स्य मंत्री अस्लम शेख यांनी शिष्टमंडळाला पाचारण केले व आश्वासन दिले की, आठवड्याभरात अश्व शक्ती इंजिन बाबत कोटा मंजुरी व परतावा वितरण बाबत आदेश काढुन मच्छिमारांना दिलासा देण्यात येईल व लवकरच इतर मागण्या बाबत बैठक घेऊन तोडगा काढण्यात येईल.सदर धरणे आंदोलनामध्ये राज्यातील सर्व सागरी जिल्हा मच्छीमार संघ व संस्थांनी संपूर्ण पाठिंबा दर्शविला.

सदर आंदोलनामध्ये महाराष्ट्र फिशर मेन काँग्रेसचे कोकण विभागीय उपाध्यक्ष मार्तंड नाखवा,राज्य शिखर संघाचे संचालक जयकुमार भाय अध्यक्ष-ठाणे जिल्हा मच्छी. सह. संघ, शेषनाथ कोळी अध्यक्ष-रायगड जिल्हा मच्छी. सह.संघ, सिराज डोसानी अध्यक्ष-माझगाव मच्छी. संस्था, किशोर गव्हाणी, विजय गिदी, सौ. अर्पिता कोळी,बाबमिया मुकादम अध्यक्ष-रत्नागिरी जिल्हा मच्छी. सह. संघ,देवेंद्र दा.तांडेल अध्यक्ष-अखिल महाराष्ट्र मच्छी. कृती समिती,कोळी महासंघाचे अध्यक्ष आ. रमेश पाटील, आगरी कोळी संघाचे अध्यक्ष जयेंद्र दादा खुणे,संजय कोळी अध्यक्ष-वसई जिल्हा मच्छी.सह.संघ, बर्नड डिमेलो उत्तन मच्छी. सह.संस्था, भाऊचा धक्का सप्लायर्स व डिलर्स असोसिएशन चे अध्यक्ष बाबासाहेब रोकडे, फारुख लधानी, बोट चालक मालक संघटना, व इतर सागरी मच्छीमार संस्था प्रतिनिधींनी निदर्शने केली.

## महाड औद्योगिक वसाहतीतील सांडपाणी वाहिनीच्या दुरुस्ती कामात विलंब

आहे, त्यामुळे या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय तसेच चौकशीच्या अनुषंगाने सांडपाणी वाहून नेण्याच्या वाहिनीच्या कामासाठी निधी उपलब्ध होण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, अशी विचारणा आमदार प्रशांत ठाकूर यांनी तारांकित प्रश्नाच्या माध्यमातून केली.

या प्रश्नावर राज्याचे उद्योग मंत्री सुभाष देसाई यांनी दिलेल्या लेखी उत्तरात सांगितले कि, महाड औद्योगिक वसाहतीतील सांडपाणी वाहीनी जुनी व जीर्ण झाली असल्याने त्यामधून काहीवेळा गळती होते व त्यामुळे प्रक्रिया केलेले पाणी शेतात शिरून शेतीचे नुकसान होण्याची शक्यता असते, तथापि सदर वाहिनी दुरुस्तीचे काम युध्दपातळीवर हाती घेण्यात येते. ज्या शेतकऱ्यांच्या शेतीचे नुकसान झाले असेल अशा शेतकऱ्यांच्या शेतीचे पंचनामे करून नुकसान भरपाई अदा केली जाते. परंतु गेल्या वर्षभरात या क्षेत्रात अशी घटना घडलेली नाही. महाड औद्योगिक वसाहतीतील २४.२ कि.मी. लांबीची सांडपाणी वाहिनी पूर्णपणे बदलण्यात येणार आहे व सदर कामासाठी सुमारे १५२ कोटी रुपये इतका खर्च अपेक्षित असून खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळाली आहे. तसेच उद्योजकांच्या संघटनेने सदर कामावरील खर्चाच्या २५ टक्के रक्कम देण्याची तयारी दर्शविली आहे. २५टक्के निधी, उद्योजकांना आकारण्यात येणाऱ्या सांडपाणी प्रक्रिया शुल्कादवारे पुढील १० वर्षात जमा होणाऱ्या निधीतून उपलब्ध करून दिला जाणार आहे.

## कुटुंबातील महिलेचे आरोग्य उत्तम तर संपूर्ण कुटुंबाचे आरोग्य उत्तम : सुभाष देसाई

प्रांताधिकारी प्रशाली जाधव दिघावकर, तहसिलदार प्रियांका आयरे, मुख्याधिकारी राहुल इंगळे, उपनगराध्यक्ष सचिन बोंबले, नगरपंचायतीच्या महिला व बालकल्याण समिती सभापती शर्मिला सुर्वे, नगरसेवक कपिल गायकवाड, अजित तारलेकर, दिनेश रातवडकर, उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.प्रदीप इंगोले, डॉ.संतोष कामेरकर, नगरसेविका नंदिनी बामगुडे आदी मान्यवरांसह महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सुरुवातीला उद्योगमंत्री सुभाष देसाई यांनी उपस्थित सर्व महिलांना महिला दिनाच्या शुभेच्छा देऊन आयोजकांना शिबिराच्या आयोजनाबद्दल शुभेच्छा दिल्या. ते पुढे म्हणाले, ग्रामीण भागातील महिलांची नियमित आरोग्य तपासणी होणे आवश्यक असून त्यांना जे आजार असतील त्यावर तात्काळ उपचार करणे देखील तितकेच महत्वाचे आहे. कुठल्याही आजाराचे वेळीच निदान झाले व त्यावर वेळीच उपचार झाले तर त्या व्यक्तीचे आरोग्य चांगले राहते. कुटुंबातील महिलेचे आरोग्य उत्तम राहिले तर तिच्या संपूर्ण कुटुंबाचेही आरोग्य उत्तम राहते. एक महिला आजारी पडली तर संपूर्ण घराचे आरोग्य बिघडते. यासाठी महिलांची आरोग्य तपासणी शिबीर माणगावात नगरपंचायत व उपजिल्हा रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आले आहे. या शिबिराचा लाभ जास्तीत जास्त महिलांनी घ्यावा. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी महिलांना विविध क्षेत्रात अधिक संधी दिली पाहिजे, असे आवाहन केले आहे. ते जे बोलतात ते करूनही दाखवतात. ते पुढे म्हणाले, माणगावातील जुनी पाणी योजना तशीच ठेवून आणखी एक नवीन पाणी योजना आपल्याला आणायची आहे. काळनदीत जाणाऱ्या सांडपाण्याचे नियोजन आपल्याला करायचे आहे. नाट्यगृहाचे काम पूर्णत्वास न्यायचे आहे.

## राज ठाकरे राज्यपालांवर बरसले

संताप व्यक्त करण्यात आला. त्यानंतर आता राज ठाकरे यांनीही आपल्या खास शैलीत राज्यपालांचा समााचार घेतला.

दरम्यान, मनसेच्या आजच्या मेळाव्यात छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन करून भारतरत्न लता मंगेशकर, शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांना आदरांजली वाहून सुरुवात करण्यात आली. या मेळाव्याला मनसेचे नेते बाळा नांदगावकर, नितीन सरदेसाई, आमदार राजू पाटील, अनिल शिदोरे, अमित ठाकरे आदी उपस्थित होते.

---

मा.राव सा।
प्रोसेस जमा रु.५०/- अर्जदारातर्फे वकील : ॲड.अविनाश भोईर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (वरिष्ठ स्तर) साहेब यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.३३१/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२०/०४/२०२२

कै.सुधीर मुरलीधर महादे (मयत)
१) श्रीमती.पुनम सुधीर महादे
वय : २९ वर्षे, धंदा : गृहिणी
२) कु.आयुष सुधीर महादे
वय : १३ वर्षे, धंदा : शिक्षण
अज्ञान तर्फे पालक श्रीमती.पुनम सुधीर महादे,
दोघेही रा.पिसार्वे, पो.तळोजा, ता.पनवेल,
जि.रायगड, पिन नं.४१०२०८ — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

सर्व तमाम लोकांस कळविण्यात येते की, ज्याअर्थी कै.सुधीर मुरलीधर महादे (मयत) यांचे निधन दिनांक ०३/०४/२००८ रोजी अष्टविनायक हॉस्पिटल, खांदा कॉलनी, पनवेल येथे निधन झाले.

कै.सुधीर मुरलीधर महादे (मयत) यांच्या मृत्यूसमयी त्यांच्या मालकीची अशी खालील मिळकत होती :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : पनवेल, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथील फायनल प्लॉट नं.१०८, सब प्लॉट नं.३, वरील डायमंड पार्क को.ऑप.हौ.सो.लि. मधील फ्लॅट नं. बी-१६, क्षेत्र-४०० चौ.फुट (बिल्टअप)**

मयत कै.सुधीर मुरलीधर महादे (मयत) यांच्या पश्चात अर्जदार हेच कायदेशीर वारसदार आहेत. अर्जदार यांच्या या हक्काबाबत कोणालाही व्यक्तीगत हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून वर नमूद मे.न्यायालयात एक महिन्याच्या आत हजर राहून आपल्या हरकती सादर करावयाच्या आहेत.

याद्वारे असे जाहीर करण्यात येते की, वर नमूद कालावधी संपण्याच्या अगोदर योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.न्यायालय वरील अर्जदार यांचे हक्काबाबत पुरावा देण्याची ताबडतोब कारवाई करतील व मयत कै.सुधीर मुरलीधर महादे (मयत) यांचे वारसपत्रात अर्जदार हक्कदार आहेत असे शाबित झाल्यास त्यांना वारसदाखला मंजूर करील.

सदरची नोटीस आज दि.९/३/२०२२ रोजी आमच्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** | कोर्टाचा शिक्का | **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

ॲडव्होकेट : एम.एम.मालकर

### जाहीर नोटीस

खालापूर येथील मे.ज्युडिशिअल मॅजिस्ट्रेट साहेब प्रथमवर्ग यांचे कोर्टात
फौ.चौ.अर्ज क्रं.६६/२०२२

१) श्रीमती.हिराबाई बळीराम हिलन
वय : ५० वर्षे, धंदा : मोलमजुरी
२) श्री.महेश बळीराम हिलम
वय : ३३ वर्षे, धंदा : मोलमजुरी
अर्जदार क्र.१ व २ रा.इसांबे आदिवासीवाडी,
पो.माजगांव, ता.खालापूर, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
खालापूर नगरपंचायत
ता.खालापूर, जि.रायगड
जन्म-मृत्यू नोंदणी विभाग — सामनेवाला

सर्व लोकांस कळविण्यात यते की, अर्जदार क्रं.१ यांचे पती व अर्जदार क्र.२ वरील कै.बळीराम देवजी हिलम हे दि.१७/०४/१९९२ रोजी मौजे : इसांबे आदिवासीवाडी, ता.खालापूर, जि.रायगड येथे त्यांचे राहते घरी निधन पावले आहेत. कै.बळीराम देवजी हिलम हे मयत झाल्यानंतर अर्जदार यांचेकडून मयत कै.बळीराम देवजी हिलम यांचे मृत्यूची नोंद नगरपंचायत खालापूर, ता.खालापूर, जि.रायगड यांचे दप्तरी करण्याची राहून गेली आहे. असे अर्जदार यांनी अर्जामध्ये कथन करून व एक वर्षाचे आत मृत्यूनोंद न झाल्याने त्यांचे मृत्यूची नोंदणीकरिता योग्य त्या न्यायालयाकडून आदेश प्राप्त करणे गरजेचे असल्याने अर्जदार यांनी सदरचा अर्ज रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट १९६९ चे कलम १३ (३) अन्वये मृत्यू नोंदीचे आदेश मिळणेकरिता या मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

तरी ज्या कोणी व्यक्ती, इसमास सदरच्या अर्जाकामी हरकत असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत स्वतः अथवा वकीलामार्फत हजर राहून आपली हरकत किंवा लेखी म्हणणे द्यावे. अन्यथा वरील मुदतीत हरकत न असल्यास हरकत नाही असे समजले जाईल व अर्जदार यांचे लाभांत त्यांचे मागणी प्रमाणे मृत्यू नोंदीचे आदेश करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

कोर्टाच्या शिक्क्यानिशी व माझे सहीने आज दि.१८/२/२२ रोजी दिली.

**सही/- क.लिपीक फौ.न्याया.खालापूर** | कोर्टाचा शिक्का | **सही/- सहा.अधिक्षक फौ.न्याया.खालापूर**

---

मे.सोनावणे साहेब कोर्ट
अर्जदाराचे वकील
ॲड.मेहबुब गै. पटेल

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१८५८/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.०६/०४/२०२२

१) श्री.संजय यशवंत कांडपिळे
वय : ६३ वर्षे, धंदा : व्यवसाय
रा.मातृपितृ छाया, पोदी नं.१, एस.पी.मोरे कॉलेजजवळ,
सेक्टर १५, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड
२) श्री.अजय यशवंत कांडपिळे
वय : ६० वर्षे, धंदा : व्यवसाय
रा.पर्ल होम्स बिल्डींग, प्लॉट नं.४१३, के मॉल जवळ,
पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

या जाहीर नोटीसीद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार नं.१ व २ यांचे वडील कै.यशवंत गंगाराम कांडपिळे हे दि.३०/०५/२०१७ रोजी मयत झाले असून कै.यशवंत गंगाराम कांडपिळे यांच्या नावाने मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत असून सदर मिळकत महाराष्ट्र शासनाने नवी मुंबई प्रकल्पाकरिता संपादीत करण्यात आली असून सदर मिळकतीचे ॲवार्ड हे कै.यशवंत गंगाराम कांडपिळे यांचे नांवे आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**

| अ.नं. | मौजे | युनिट केस नं. | स.नं. | प्लॉट नं. | क्षेत्र चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पनवेल | पनवेल -३८३/ब | ३०५/२+३+३०६ ते ३१०+३११/१ +३११/३+३१२/२ | १६ २२(१) | १२४४.४ १२२४.० २४६८.४ | २.१६ २.४४ ४.६० |

येणेप्रमाणे वर नमूद मिळकतीच्या अनुषंगाने कै.यशवंत गंगाराम कांडपिळे यांचा वारस दाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी या मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

वरील अर्जदार हे कै.यशवंत गंगाराम कांडपिळे यांचे कायदेशीर वारसदार आहेत असे अर्जदारांचे म्हणणे आहे. अर्जदारांचे हक्काबद्दल कोणासही हरकत घ्यावयाची असल्यास अथवा वारसदाखला देण्यास कोणतीही हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १ महिन्याचे आत या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकत घेण्याची आहे. जर या कालावधीमध्ये कोणीही योग्य हरकती घेतल्या नाहीत तर मे.कोर्ट अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि अर्जदार जर कै.यशवंत गंगाराम कांडपिळे यांचे वारसपत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना वारसपत्र मंजूर करेल.

आज रोजी माझ्या सहीनिशी व मे.कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** | कोर्टाचा शिक्का | **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मा.मुजावर साहेब
वकील मनोज वारंगे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१९१०/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२०/०४/२०२२

1) R PARVATHAM IYER
2) PARVATHY SANGAMESHWAR IYER
Both are residing at-C-004, Near Yerala Medical
Rail Vihar CHS, Sector 4, Kharghar,
Tal-Panvel, Dist-Raigad 410210 — APPLICANT

अर्जदार क्र.१ यांचे पती आणि २ यांचे वडील मयत कै. S. RAMASWAMY IYER ALLIAS RAMASWAMY SUBRAMANIAN IYER राहणार सी-००४, नियर येरला मेडीकल, रेल विहार सी.एच.एस., सेक्टर-४, खारघर, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड ४१०२०६ यांचे दिनांक २९/०९/२०१६ रोजी र्निमया हॉस्पिटल, सेक्टर ४, खारघर, नवी मुंबई ४१०२०६ येथे निधन झाले आणि सदर मयताचे नावे असलेली स्थावर मिळकत खालीलप्रमाणे :-

SCHEDULE OF PROPERTY
Flat No.C-004, Building No.C,
Rail Vihar Co-Operative Housing Society Ltd.,
Kharghar, Tal-Panvel, Dist-Raigad.
Valued at Rs.4,96,000/-

वरील मिळकती बाबत उक्त अर्जदार यांनी वारस दाखला मिळण्याकरिता अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल आणि वरील मिळकतीच्या वारस दाखल्याबाबत कोणाचे हक्क अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत ह्या न्यायालयात हजर होवून दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न घेतल्यास सदरहू न्यायालय वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयताचे मिळकतीचे वारस म्हणून वारसदाखला देईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.०९/०३/२०२२ रोजी माझ्या सहीने दिले.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** | कोर्टाचा शिक्का | **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी बाम्या बाळ्या महार तर्फे वारस श्री.अनंता शिमग्या कांबळे, रा.मु. वळवली, ता.पनवेल यांचे कडून खालील वर्णनाची मिळकत खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : वळवली, ता.पनवेल, जि.रायगड**

| मौजे | सर्व्हे नं. | हिस्सा क्र. | क्षेत्र हे.आर |
|---|---|---|---|
| वळवली | ४९ | ० | ०-१-० |

सदर वर नमूद मिळकत बाम्या बाळ्या महार मयत तर्फे वारस श्री.अनंता शिमग्या कांबळे यांचे नावे असलेली मिळकत आमचे अशिलांनी खरेदी करण्याचे ठरविले आहे. व सदरहू मिळकती सिडको दप्तरी आमचे अशिलांचे नावे त्रिपक्षीय कराराद्वारे हस्तांतर करून घेण्याचे ठरविलेले आहे.

तरी सदर वर नमूद मिळकतीवर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज, करार वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसाच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा न आल्यास सदर वर नमूद मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा विक्री करार करून सिडको दप्तरी आमचे अशिलांचे नावे हस्तांतर करून घेतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दि.०९/०३/२०२२

**सही/-**
**ॲड.अजित धनराज म्हात्रे**
**तळमजला, दत्ताचार्य अपार्टमेंट,**
**पायोनिअर सोसायटी, स्वामी**
**नित्यानंद मार्ग, युविका हॉटेलजवळ,**
**जुने पनवेल-४१०२०६**
**मो.नं.८१६९८४७७०७**

---

वाबळे साहेब कोर्ट
वादीतर्फे ॲड.एम.एम.मालकर

### जाहीर नोटीस

खालापूर येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.रे.मु.नंबर ९०/२०२१
नि.नं.९/ड
ने.ता.०४/०४/२०२२

श्री.सुधीर वामन पाटील व इतर — वादी
विरुद्ध
श्री.वामन पांडुरंग पाटील — प्रतिवादी

सदर कामी वादीतर्फे जाहीर नोटीस देण्यात येते की, खालीलप्रमाणे :-

मी वादी सुधीर वामन पाटील दि.२३/०३/२०१३ रोजी सकाळी ९ वाजता नेहमीप्रमाणे कामावर निघून गेलो. रात्री ०९.३० वाजता परत घरी आलो. त्यावेळेला माझी आई मला म्हणाली की, तुझे वडील सकाळी १० वाजता पेपर आणण्याकरिता खोपोली बाजारपेठेत गेले होते. ते अजूनपर्यंत घरी आले नाहीत, असे सांगितल्याने माझे वडीलांना दारु पिण्याची सवय होती व यापूर्वीही असे न सांगता माझ्या बहिणीकडे पाली येथे गेले होते म्हणून मी बहिण सौ.गीता भगवान तिडके, रा.पाली हिच्याकडे चौकशी केली तसेच माझी चुलत बहिण सौ.पुष्पा तुकाराम पाठारे, रा.गोंदाव, तालुका : सुधागड तसेच माझ्या मुळगावी मौजे : खानाव, ता.खालापूर येथे चौकशी केली. परंतु त्यांच्याकडे वडील गेले नसल्याचे समजले. तसेच कर्जत, निंबोडे येथील नातेवाईक तसेच सर्व नातेवाईकांकडे फोन करून चौकशी केली. परंतु ते तिकडे गेले नाहीत असे सांगितल्यानंतर आम्ही त्यांची वाट पाहिली. परंतु ते अद्याप घरी परत आले नाहीत, म्हणून मी आज पोलीस ठाण्यात हजर राहून तक्रार देण्यास आलो आहे. माझे वडिलांचे वर्णन खालीलप्रमाणे आहे. वय : ६७ वर्षे, उंची ५ फुट ६ इंच, रंग गोरा, चेहरा उभट, केस कलप लावून काळे केलेले, डोळे काळे, पायात पांढऱ्या रंगाची चप्पल, पांढऱ्या रंगाचा शर्ट त्यावर करड्या रंगाचे पट्ट्या असलेला, काळ्या रंगाची पॅन्ट येणेप्रमाणे वरील वर्णनाचे माझे वडील श्री.वामन पांडुरंग पाटील हे दि.२३/०३/२०१३ रोजी सकाळी १० वा. चे सुमारास घरुन पेपर आणण्याकरिता खोपोली बाजारपेठ येथे गेले असता ते आजपावेतो परत घरी न आल्याने म्हणून मी माझे वडिल हरविलेबाबत माझी तक्रार आहे.

सदर कामी वादीने या मे.कोर्टामध्ये प्रतिवादी विरुद्ध हक्कज्ञानपानाचा हुकूम मिळणेकामी दावा दाखल केलेला आहे. तरी सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी श्री.वामन पांडुरंग पाटील हे दि.२३/०३/२०१३ रोजी मौजे : खोपोली, ता.खालापूर, जि.रायगड येथून परागंदा झाले आहेत. वर नमूद वादी १ ते ५ हे त्यांना कायदेशीर वारस आहेत. या हक्काबाबत कुणाही व्यक्तीला हरकत घ्यावयाची असलयास त्यांनी याकामी सदर व्यक्तीने स्वतः अथवा कोणाला माहित असल्यास ती व्यक्ती हयात असल्यास अथवा कोणाच्या ताबेकब्जात असल्यास त्यांनी सदरचे व्यक्ती हयात आहे असे दर्शविणारे कायदेशीर पुराव्यासहीत अथवा वकीलांमार्फत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून या मे.कोर्ट खालापूर, जि.रायगड या कोर्टात १ महिन्याचे आत हजर राहून हरकत घ्यावयाची आहे. याद्वारे असे जाहीर करण्यात येते की, हा कालावधी संपण्याआधी योग्य ती हरकत घेतली नाही तर मे.कोर्ट वरील प्रतिवादीविरुद्ध दाखल हक्कज्ञापनाच्या हुकूमाच्या दाव्यात योग्य ती हरकत घेतली नाही तर मे.कोर्ट वरील वादी यांच्या हक्कात योग्य ती कार्यवाही करेल आणि वादीच्या हक्कात सदरचा प्रतिवादी विरुद्धचा हक्कज्ञानपाचा हुकूम प्राप्त केला जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दि.१६/०२/२०२२ रोजी माझी सही न्यायालयाच्या शिक्क्याानिशी दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.क.स्तर, खालापूर** | कोर्टाचा शिक्का | **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, खालापूर**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## २६ वर्षीय तरुणीला अश्लील मेसेज पाठवला प्रकरणी गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

उलवे येथे राहणाऱ्या २६ वर्षीय तरुणीला अश्लील मेसेज पाठवल्या प्रकरणी न्हावाशेवा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

२६ वर्षे तरुणी नवी मुंबईत एका कंपनीत नोकरी करते. या तरुणीला एक ईसम वारंवार फोन करत असे. तरुणीने तो नंबर ब्लॉक केल्यानंतर फोन येणे बंद झाले. त्यानंतर दुसऱ्या नंबर वरून मेसेज यायला सुरुवात झाली. यावेळी त्या तरुणीने मॅसेज केल्यास पोलिस ठाण्यात तक्रार करेल असा मेसेज पुढे पाठवला. त्यानंतर समोरील व्यक्तीने व्हाट्सअप द्वारे अश्लील मेसेज पाठवला. या इसमावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## दुकानातील टेबलावर ठेवलेल्या मोबाइलची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

दुकानातील टेबलावर ठेवलेल्या मोबाईलची चोरी केलयाप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. खारघर, सेक्टर ३५ ई येथील मोहम्मद हुसेन हे शाह प्लायवूड नावाच्या दुकानात होते. यावेळी त्यांच्या दुकानात एक सावळ्या रंगाचा २५ वर्षे वयाच्या तरुण आला होता. काही वेळानंतर तो तरुण निघून गेला यावेळी त्यांनी टेबल वर ठेवलेला मोबाइल पाहिला असता मोबाईल दिसून आला नाही.

## कोंझरी बौद्धवाडी येथे श्रमदानातून नदीवर बांधला वनराई बंधारा

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत कोळे हद्दीतील कोंझरी बौद्धवाडी येथे रविवारी स्थानिक ग्रामस्थ व मुंबईकर मंडळी यांचे सहकार्याने श्रमदान करून नदीवर बंधारा बांधण्यात आला आहे. सध्या उन्हाळा वाढत चालला असून मानव जातीपासून सर्वच सजीव जीवांना या कडक उन्हाचा त्रास जाणवू लागला आहे. माणसाबरोबर पाळीव व वन्य प्राण्यांना सुद्धा उन्हाचे चटके सोसावे लागत असून पाण्यासाठी वणवण भटकावे लागते. अनेक ठिकाणी पाण्याची कमतरता जाणवू लागली आहे त्यातच ज्या ठिकाणी पाण्याचे स्रोत उपलब्ध आहेत ते जतन करून ठेवणे काळाची गरज वाटू लागली आहे. पाणी अडवा पाणी जिरवा ही संकल्पना लक्षात घेऊन काही स्वयंसेवी संस्था, तरुण मंडळे, ग्रामस्थ मंडळी नदीला वनराई बंधारे बांधत आहेत. प्रामुख्याने पाण्याची वाढती गरज लक्षात घेता, भीषण भासणारे उन्हाचे चटके, जनावरांना लागणारे पिण्यासाठी पाणी यावर उपाय म्हणून कोंझरी बौद्धवाडी येथील नदीवर बंधारा घालण्यात आला.

### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

# महिलांना संघर्षाने मिळाला अधिकार : प्रकाश होवाळ

**दै.रायगड नगरी । कर्जत**



महिलांना संघर्षाने मिळाला अधिकार असे प्रतिपादन कर्जत रेल्वे स्थानकाचे पोलीस निरीक्षक प्रकाश होवाळ यांनी जागतिक महिला दिनाच्या कार्यक्रमात केले.

कर्जत रेल्वे पॅसेंजर असोसिएशन, आरपीएफ, जिआरपी ह्यांच्या संयुक्त विद्यमाने कर्जत रेल्वे स्थानकात जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. आज अनेक क्षेत्रात महिला उच्च पदावर कार्यरत आहेत, कुणी वैमानिक आहेत तर कुणी पोलीस, सैनिक तर कुणी मोटरमन अशा विविध क्षेत्रात महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावुन काम करत आहेत. विविध क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांना ह्या पदावर पोहचण्यासाठी अपार मेहनत आणि संघर्ष करावा लागला आहे,महिला आहेत म्हणुन सहज ह्या पद-ावर त्यांना कुणी विराजमान केलेले नाही तर त्या स्वकर्तृत्वाने, मेहनतीने ह्या पदावर पोहचल्या आहेत. त्याचबरोबर एखाद्या महिलेमुळे, स्त्रीमुळे पुरुषाचे अस्तित्व आहे, पुरुषामुळे स्त्रीचे अस्तित्व नाही असे गौरवोद्गार कर्जत रेल्वे जिआरपीचे पोलीस निरीक्षक प्रकाश होवाळ ह्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना व्यक्त केले.

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधुन आरपीएफच्या फराहनाज अन्सारी व होमगार्डच्या माधुरी खांडळे ह्यांनी महिलांच्या जीवनात येणाऱ्या अडचणी, त्यावर मात करुन घर, संसार सांभाळुन नोकरी करताना करावी लागणारी तारेवरची कसरत ह्यासह आपल्या जीवनातील व कार्यक्षेत्रातील अनुभव मांडले. समाजात महिलांवर होणारे अन्याय, अत्याचार पाहता स्वसंरक्षणासाठी प्रत्येक महिला व मुलींनी कराटेचे प्रशिक्षण घेणे जरुरी आहे असे मत कर्जत रेल्वे पॅसेंजर असोसिएशनचे कार्याध्यक्ष सुरेश खानविलकर यांनी व्यक्त केले. तर कार्यक्रमास उपस्थित अस-लेले कर्जत तालुका सराफ असोसिएशनचे अध्यक्ष मोहन ओसवाल यांनी खेळापासुन मनोरंजनापर्यंत, राजकारण, लष्कर तसेच संरक्षण मंत्रालयापर्यंत विविध मोठ्या भुमिका महिला बजावत आहेत. त्यामुळे त्यांच्या कामाची दखल सर्व पातळीवर घेतली जात आहे असे प्रतिपादन केले.

सदर कार्यक्रमास शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख भाई गायकर यांच्यासह आरपीएफ, जिआरपी, होमगार्ड महिला कर्मचाऱ्यांसह आरपीएफचे पीएसआय पांडुरंग उबाळे, अमोल गोगावले, संजय घोडके, जिआरपीचे किरण देवकर, कर्जत रेल्वे पॅसेंजर असोसिएशनच्या सदस्या शर्वरी कांबळे, सचिव प्रभाकर गंगावणे, खजिनदार विनोद पांडे, सदस्य शिव-सेवक गुप्ता, किशोर तावरे आदि मान्यवर उपस्थित होते.

# क्रिकेटची टीम हरल्याचा राग मनात धरून लोखंडी कोयत्याने केले डोक्यात वार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

क्रिकेटच्या सामन्यात टीम हरल्याचा राग मनात धरून लोखंडी कोयत्याने डोक्यात वार केल्याची घटना पोयंजे येथे घडली आहे. यात शशिकांत वसंत सोनटक्के (वय ५०) हे जखमी झाले असून महेंद्र जनार्दन गायकर (रा. पोयंजे) याच्याविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी महेंद्र गायकर याला अटक करण्यात आली आहे.

पोयंजे गावातील कोदेळे क्रिकेट मैदानात पोयंजे क्रिकेट लीगचे आयोजन करण्यात आले होते. यात शशिकांत सोनटक्के यांनी एक संघ घेतला होता. एकूण आठ संघांनी यात सहभाग घेतला. सेवन स्टार संघाने सर्व सामने जिंकल्यानंतर अंतिम सामन्यात प्रवेश केला. अंतिम सामना गावातील स्वरूपा एलेव्हन या टीमशी होता. स्वरूपा इलेव्हनचा व्यवस्थापक महेंद्र गायकर हा होता.

अंतिम सामना शशिकांत सोनटक्के यांच्या टीमने जिंकल्यानंतर ते जिंकल्याचा आनंद साजरा करत होते. यावेळी महेंद्र गायकर हा त्याच्या हातामध्ये लोखंडी कोयता घेऊन आला आणि शशिकांत यांच्या डोक्यावर मारला. ह्यात शशिकांत हे गंभीर जखमी झाले. व जमीनीवर खाली पडले.

यावेळी शिवीगाळ करून पोलिसांना सांगितले. तर ठार मारण्याची धमकी देऊन महेंद्र गायकर पळून गेला. सोनटक्के यांच्यावर छत्रपती शिवाजी महाराज हॉस्पिटल शेडुंग टोल नाका येथे उपचार सुरू आहेत.

# श्री लक्ष्मीनारायण देवाचा १०४ वा वाढदिवस साजरा



**दै.रायगड नगरी । तळा**

दैवज्ञ (सोनार)समाज तळा यांचे श्री लक्ष्मी नारायण देव-ाचा १०४ वा वाढदिवस सोहळा फाल्गुन शुद्ध ६ मंगळवार ८मार्च रोजी साजरा करण्यात आला.

सकाळी ५.३०वा. काकडारती पुजा, ९वा. एकादशी अभिषेक, पुण्हवाचन यजमान (सौ.व श्री विश्वेश आंबेतकर यांच्या हस्ते) आरती १२वा. महाआरती महाप्रसाद, दुपारी ४ते ५ जागतिक महिला दिन व महिलांचे हळदी कुंकू समारंभ, ५ वा.समाज भुषण, रायगड भुषण उद्योजक नंदाशेट राजपूरकर (हॉटेल ओपन अंब्रेला) नवनिर्वाचित नगराध्यक्षा अस्मिता भोरावकर, उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे, प्रभाग१०चे नगरसेवक मंगेशशेट शिगवण व युक्रेन देशातून मायदेशी परत-लेला डॉ.विद्यार्थी यश काळबेरे याचा शाल,श्रीफळ सन्मान पत्र, पूष्पगुच्छ सत्कार स्वरूप होते सचीव प्रशांत वेदक,कार्यकारी अध्यक्ष सुहास वावेकर उपस्थितमाजी अध्यक्ष प्रकाश पितळे यांच्या व ज्ञाती बांधवांच्या हस्ते करण्यात आला. तसेच नंदकुमार वेदक यांचा जन्म दिन वाढदिवस केक कापून साजरा केला. यावेळी व्यासपीठावर नंदाभाई राजपूरकर, प्रकाश पितळे, उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे, नगरसेवक मंगेश शिगवण यशकाळबेरे नंदकुमारवेदक उपस्थित होते. या आंनददायी धार्मिक सोहळ्यात सर्व समाज बांधव भगीनीउपस्थित होत्या. हा कार्यक्रम सर्वांच्या सहकार्याने पार पडला.


मा.गोडसे साो

अर्जदारातर्फे वकील
श्री.एन.ए.शेख

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.५४/२०२१
नि.नं.११/ड
ने.ता.२०/०४/२०२२

१) श्रीमती.फैहमीदा अशरफ पटेल
वय : ५० वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.आसीफ इस्माईल मदार उर्फ पटेल
वय : ४१ वर्षे, धंदा : व्यापार
३) श्री.मुजम्मील इस्माईल मदार उर्फ पटेल
वय : ३९ वर्षे, धंदा : व्यापार
१ ते ४ सर्व रा.तळोजा पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, पै.ईसमाइल अब्दुल कादीर पटेल हे दि.२७/०२/२०१८ रोजी तळोजे पाचनंद येथे मयत झाले असून पै.ईसमाइल अब्दुल कादीर पटेल यांची पत्नी पै.नजमाबी इस्माईल मदार उर्फ पटेल ही देखील दि.०७/०४/२०२१ रोजी तळोजे पाचनंद येथे मयत झाले असून मयत पै.ईसमाइल अब्दुल कादीर पटेल यांची आई पै.खातुनबी अब्दुल कादीर पटेल उर्फ मदार ही देखील तळोजे पाचनंद येथे सन १९८८ रोजीच्या सुमारे मयत झालेली आहे. त्यांच्या हयातीत त्यांच्या मालकीच्या मिळकती मे.विशेष भुसंपादन अधिकारी मेट्रो सेंटर पनवेल यांनी खालील वर्णनाची जमीन नवी मुंबई प्रकल्पाकरिता संपादीत केलेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : ओवे, ता.पनवेल, जि.रायगड**

| युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|---|
| ३४६/ओवे | ३०८ | १/ब | ०-४०-० | 0.00 |

वरील वर्णनाच्या शेतजमीन मयत पै.ईसमाइल अब्दुल कादीर पटेल व पै.नजमाबी इस्माईल मदार उर्फ पटेल यांच्या मालकीची होती. सद-रची शेतजमिनी विशेष भूसंपादन अधिकारी यांनी संपादीत केलेली आहे. शासनाच्या नियमानुसार प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना सिडकोच्या वतीने १२.५ टक्के योजनेंतर्गत विकसित भूखंड देणार असल्याने तसेच मयताच्या नावे सिडकोकडून काही विकसित भूखंड मिळणार असल्याने अर्जदार यांनी मयताचा वारस दाखला मिळण्याकरिता मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर पनवेल यांचे कोर्टात चौकशी अर्ज दाखल केला आहे. सदरहू अर्जातील जमिनीबाबत अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत योग्य त्या पुराव्यासह स्वतः अगर आपल्या वकीलामार्फत कोर्टात उपस्थित राहून हरकत घ्यावी. वरील मुदतीत हरकती न आल्यास असे समजण्यात येईल की वरील मिळकतीबाबत इतर कोणाचाही हक्क व हितसंबंध नाही व असल्यास तो त्यांनी सोडून दिला आहे व सदरहू अर्जदार ना.कोर्टाकडून योग्य तो हुकूम घेतील.

आज ०९ माहे मार्च सन २०२२ रोजी आमच्या सह्या व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल



Rao Saheb

**Adv. Sujata Patil**
8879416483

### PUBLIC NOTICE FOR HERESHIP CERTIFICATE

**IN THE COURT OF CIVIL JUDGE (S.D) PANVEL AT PANVEL**

**M.A.NO :- 303/2022**
**Exh : 8/D**
**Next Date : 20/04/2022**

Whereas decreased **LATE SHREE RAMKISHAN NATHIRAM JAKHMOLA** Hindu, Indian Inhabitant, residing at the time 22/02/2021 of his death at Uttarakhand, WHEREAS **1) Mrs.Shweta Ramkishan Jakhmola, 2) Master Ansh Jakhmola 3) Ms.Mehak Jakhmola** they all residing At-502, Greenfield Residency Sector-35 I, Kharghar application for Heirship Certificate of Property to The Court Of Civil Judge (S.D.) Panvel At Panvel for the purpose of faithfully administer the property of the said deceased and in any way connecting his.

Details of the property included in the properties mentioned in the schedule written herein under.

**SCHEDULE OF PROPERTY**
**FLAT NO.502, 5 th FLOOR, GREENFIELD RESIDENCY, PLOT NO.03, SECTOR-35 I, TAL.PANVEL, DIST-RAIGAD, NAVI MUMBAI, MAHARASHTRA-410210, Adm. area 577.596 Sq. Feet Carpet Area + 97 Sq. Feet Flower Bed Area + 25 Sq. Feet Terrace Area.**
**Total Consideration Amount of Rs.40,00,000/- (Rupees Forty Lakh Only)**

This is to give notice to all person who may have objection to this Heirship Certificate Application may appear in THE COURT OF CIVIL JUDGE (S.D.) PANVEL AT PANVEL within one month from the date of this proclamation, there to entire their objection, and it is hereby, declared that if no sufficient objection is offered before the expiration of that period, the judge Of Civil Judge (S.D.) Panvel At Panvel will forthwith proceed to receive proof if the said WHEREAS **1) Mrs.Shweta Ramkishan Jakhmola, 2) Master Ansh Jakhmola 3) Ms.Mahek Jakhmola**, right, and to grant them provided they shall appear to entitle thereto, a certificate of Heirship Certificate of the said deceased **LATE SHRI RAMKISHAN NATHIRAM JAKHMOLA.**

Date : 9/03/2022

SD/- Jr.Clerk Civil Court Panvel — Court Seal — SD/- Asst.Superitadant Civil Court Panvel



### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री.अशोक मोतीराम जयधारा यांनी मौजे : पारगाव डुंगी, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीमधील श्रीमती.जनाबाई पांडुरंग खुटले यांचे मालकी तथा इतर सर्व हक्क हितसंबंधासहीत सदर मिळकत कायमस्वरुपी खरेदीखताने मालकीहक्कात हस्तांतरीत करून घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : पारगाव डुंगी, ता.पनवेल, जि.रायगड**

| भूमापन क्र. | भूमापन क्र.चा उपविभाग | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| ४० | ९ | ०-३१-६० | ४.२८ |

सदर जाहीर नोटीशीद्वारे सर्व व्यक्ती / लोकांस कळविण्यात येत आहे की, सदर मिळकतीस अनुसरुन कुणीही व्यक्ती, संस्था, कंपनी, भागीदारी इत्यादींचा कुठल्याही प्रकारचा दान, गहाण, तारण, खरेदी, बयाणा, कर्ज, पोटगी, अन्न, वस्त्र, निवारा, वहिवाट, बक्षिस इत्यादीद्वारे कसलाही हक्कहितसंबंध असल्यास, सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांचे आत आपले हक्क हितसंबंधाच्या स्वरुपासहीत प्रथमदर्शनी पुराव्यासह खालील सही करणार यांसकडे खाली नमूद पत्यावर आपल्या लेखी हरकती रजिस्टर पोस्टाद्वारे अथवा समक्ष दाखल कराव्यात, सदर २१ दिवसांचे आत कुणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व अनुषंगिक दस्त कायदेशीरपणे पूर्ण करतील व त्यानंतर मागावून आलेल्या कसल्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाहीत.

दि.०९/०३/२०२२
ठिकाण : पनवेल

**सही/-**
**ॲड.शरद जाधव**
**तळमजला, रॉयल प्राईड बिल्डींग, भूखंड क्रं.११३, मिडल क्लास को. ऑ.हौ.सोसायटी, पनवेल-४१०२०६ ता.पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.९८२०६३७१७५**



राव साहेब

वकील ॲड.आर.एल.राऊत

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कार्यालयात

दि.चौ.अर्ज क्र.२७५/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१३/०४/२०२२

श्री.अभिजीत बबन कांबळे
वय : ४१ वर्षे, धंदा : नोकरी
रा.फ्लॅट नं.ए/६०१, ६ वा मजला, सुरज कॉम्प्लेक्स
सी.एच.एस.लि., प्लॉट नं.२ व २२, सेक्टर ३६,
कामोठे, नवी मुंबई, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

१) श्रीमती.उषा बबन कांबळे
वय : ६० वर्षे, धंदा : गृहिणी
रा.फ्लॅट नं.ए/६०१, ६ वा मजला, सुरज कॉम्प्लेक्स
सी.एच.एस.लि., प्लॉट नं.२ व २२, सेक्टर ३६,
कामोठे, नवी मुंबई, ता.पनवेल, जि.रायगड
२) श्री.अमोल बबन कांबळे
वय : ३८ वर्षे, धंदा : नोकरी
रा.फ्लॅट नं.बी-२०२, थारवानी रेसिडेन्सी,
प्लॉट नं.२, सेक्टर-६ ए, कामोठे, नवी मुंबई,
ता.पनवेल, जि.रायगड
३) सौ.निशीगंधा प्रितम आढाव
वय : ४३ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.डी/२११, ऐरोली टॉवर,
सेक्टर-१९, ऐरोली, नवी मुंबई-४००७०८ — सामनेवाले

ज्याअर्थी सदरच्या जाहीर नोटीसद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांचे वडील मयत बबन दत्तू कांबळे यांचे दि.२७/०१/२०१४ रोजी एम.जी.एम. हॉस्पिटल, कामोठे, नवी मुंबई येथे निधन झाले असून अर्जदाराने सदरहू यमताचे नावे असलेल्या मिळकतीबाबत वारस दाखला मिळण्याकरिता अर्ज दिला आहे. सदर मयत बबन दत्तू कांबळे याच्या नावे ५० टक्के हिस्सानुसार असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

50% share in Flat bearing No.A-601, On 6 th Floor, adm. about 52.62 Sq. Mtr. (Built up Area) + 39.46 Sq. Mtr. Carpet and 4.50 Sq. Mtr. (Terrace), Suraj Complex C.H.S. Limited constructed on Plot No.2 & 21, Sector-36, at Kamothe, Navi Mumbai, Taluka-Panvel, District-Raigad, valued at Rs.10,00,000/- (Rupees Ten Lacs Only) and aslo Share Certificate bearing its no.38, Share No.186 to 190 of Rs.250/-

Totally valued at Rs.10,00,250/- (Rupees Ten Lacs and Two Hundred and Fifty Only)

ज्याअर्थी सदरहू अर्जदार हे मयत बबन दत्तू कांबळे यांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल आणि वरील मिळकतीच्या वारस दाखल्याबद्दल कोणाचे हक्क अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्यांनी लेखी हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवून दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य ती हरकत न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबित दिसल्यास सदरहू मयताचे वरील मिळकतीचे वारस म्हणून दाखला देईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.०८ माहे ०३/२०२२ रोजी माझ्या सहीने दिले.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल



मा.श्री.ए.एम.मुजावर

वकील श्री.संदीप शेरेगर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१५९७/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२८/०४/२०२२

श्रीमती.निलम राजबाबू पासी व इतर — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, कै. श्री.जगधारी राम हे दि.०२/०५/२०२१ रोजी आझमगड, उत्तरप्रदेश येथे मयत झाले आहेत. कै.श्री.जगधारी राम यांचे मृत्यू पश्चात अर्जात नमूद केलेल्या मिळकत हे त्यांच्या वारसांची नावे निलम राजबाबू पासी (मुलगी), श्वेता (मुलगी), पुनम आनंद कुमार (मुलगी), सपना जगधारी राम (मुलगी), सुजित कुमार (मुलगा) हे वारस आहेत. सदरच्या अर्जात दिलेली आहे. सदरहू मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**अ-४०५, आर्म अव्हेन्यू गृहनिर्माण संस्था मर्यादित, प्लॉट नंबर १२, शिल्प चौक, सेक्टर-२०, खारघर, पनवेल, जि.रायगड**

वरील अर्जदार हे कै.श्रीजगधारी राम यांचे कायदेशीर वारस आहेत. ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.श्रीमती.निलम राजबाबू पासी यांच्या वारस पत्रास हक्कदार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल



मा.गोडसे मॅडम यांचे कोर्ट

अर्जदाराचे वकील : श्री.विकास एस. पाटील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.३२९/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२७/०४/२०२२

१) श्रीमती.जयश्री मोहन म्हात्रे
वय : ५२ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.समीर मोहन म्हात्रे
वय : २६ वर्षे, धंदा : नोकरी
१ व २ रा.बेलपाडा, ता.पनवेल, जि.रायगड
३) योगिता मोहन म्हात्रे उर्फ
सौ.योगिता शेखर ठाकूर
वय : ३६ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.धुतूम, ता.उरण, जि.रायगड
४) योजना मोहन म्हात्रे उर्फ
योजना रोहित थळी
वय : २९ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.नागाव, काठे आळी, ओएनजीसी रोड, ता.उरण, जि.रायगड
५) सौ.अनुसया आत्माराम ठाकूर
वय : ५५ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.बी.३/५, सेक्टर १, जेएनपीटी,
टाऊनशिप, उरण, ता.उरण, जि.रायगड
६) सौ.विजया प्रल्हाद मढवी
वय : ५१ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.गावठाण, ता.उरण, जि.रायगड
७) श्री.गजानन अनंत म्हात्रे
वय : ४८ वर्षे, धंदा : नोकरी
८) श्री.भार्गव अनंत म्हात्रे
वय : ४६ वर्षे, धंदा : नोकरी
७ व ८ रा.बेलपाडा, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील अर्जदार नं.१ हिची सासू व अर्जदार नं.२ ते ४ यांची आजी तसेच अर्जदार नं.५ ते ८ यांची आई कै.नागुबाई अनंत म्हात्रे रा.मु.बेलपाडा, पो.जासई, ता.पनवेल, जि.रायगड ह्या दि.२८/०४/२०२१ रोजी मु.बेलपाडा, पो.जासई, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाल्या आहेत. कै.नागुबाई अनंत म्हात्रे यांचा मुलगा कै.मोहन अनंत म्हात्रे हे दि.१९/०७/२०२१ रोजी मु.बेलपाडा, पो.जासई, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाला आहे. अर्जदार हे कै. नागुबाई अनंत म्हात्रे यांच्या खालील मिळकतीचा वारस दाखला मिळणेसाठी अर्ज केला तिचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| गाव | अंतिम निवाडा क्रमांक | स.नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|---|
| धुतूम ३/९७ | १९/९७ | १६ | १ | ०-१०-६ |
| | | १६ | ७ | ०-०५-० |
| | | १७ | १ | ०-१५-७ |
| | | १८ | ९ | ०-०२-३ |
| | | १९ | १+३+७/ब | ०-२१-८ |
| | | २० | ११ | ०-११-५ |
| | | २० | १३ | ०-१६-० |

वरील अर्जदार हे कै.नागुबाई अनंत म्हात्रे यांचे कायदेशीर वारस आहेत. या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.नागुबाई अनंत म्हात्रे यांच्या वारस पत्रास हक्कदार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.९/०३/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

